ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख १६ मार्च, १९६० | अंक ११

## विविध माहिती

**सूदानमधील पहिला साखर-कारखाना**—सूदानमधील पहिला साखर-कारखाना पश्चिम जर्मनीच्या मदतीनें उभारण्यांत येणार आहे. सूदानला लागणाऱ्या साखरेपैकी निम्मी साखर हा कारखाना एकटाच उत्पन्न करूं शकेल. दरसाल ५५,००० टन साखर निर्माण करूं शकेल एवढी मोठी यंत्रसामुग्री कारखान्यासाठी वापरण्यांत येणार आहे.

**भारी उद्योगधंद्यांना प्राधान्य**—मराठा चेंबरच्या रौप्य-महोत्सवाच्या प्रसंगीं भाषण करतांना मध्यवर्ती सरकारचे उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा म्हणाले कीं तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भारी उद्योगधंद्यांना प्राधान्य देण्यांत येईल. भारताच्या औद्योगीकरणाचा पाया मजबूत होण्यासाठी असें करण्याशिवाय गत्यंतर नाहीं, असेंहि ते म्हणाले.

**सिनेमा फिल्म्सवरील कर**—बंगालचे मुख्य मंत्री डॉ. बी. सी. रॉय ह्यांनीं फिल्म्सवर बसविण्यांत आलेल्या जादा अबकारी कराबद्दल नापसंति दर्शविली आहे. मध्यवर्ती सरकारच्या अंदाजपत्रकांत बसविण्यांत आलेल्या ह्या करामुळें सिनेमाच्या धंद्यांतील अनेक लोकांना रोजगाराला मुकावें लागेल, अशी भीतीहि त्यांनीं व्यक्त केली.

**प्राचीन देवालयाचा शोध**—उज्जैन सिटी कॉर्पोरेशनचे कामगार एका रस्त्याचें काम करीत असतां त्यांना एका प्राचीन देवालयाचा शोध लागला आहे. हें देवालय विक्रमादित्याच्या कालांतील असावें असा अंदाज करण्यांत आला आहे. 'विक्रमादित्याच्या वेळच्या एका प्राचीन देवळाशेजारीच हें नवें मंदिर सांपडलें आहे.

**औरंगाबाद होटेल**—दिल्ली येथील औरंगाबाद होटेल आतांपर्यंत फार उच्च वर्गांतील प्रवाशांनाच परवडत असे. त्यांतील दर भारी असल्यानें बहुधा परदेशीय प्रवासीच त्याचा फायदा घेत. त्यामुळें होटेल तोट्यांत चालत असे. आतां इंडिअन एअरलाइन्स कॉर्पोरेशनच्या प्रवाशांनाहि हें होटेल खुलें करण्यांत येणार आहे.

**माणूस समुद्राचें लेकरूं आहे?**—मानवाच्या उत्पत्ती-संबंधीनें ऑक्सफर्ड येथील एका प्राध्यापकानें नवीन उपपत्ति मांडली आहे. त्याच्या मतानें मनुष्यप्राणी हा सागरोत्पन्न आहे. आपल्या उपपत्तीच्या सिद्धीसाठी ते गेलीं ३० वर्षे पुरावा गोळा करीत होते. मनुष्याला समुद्रकिनाऱ्याजवळ राहण्यास आवडते ह्याचें कारण तो मुळांत सागरोत्पन्न आहे, असें त्याचें म्हणणें आहे.

**अन्नधान्याच्या स्वयंपूर्ततेसाठी**—अन्नधान्याच्या उत्पादनाच्या बाबतींत स्वयंपूर्णता यावी म्हणून पाकिस्तानमध्यें दुबार पिकें घेण्याची मोहीम चालू करण्यांत येणार आहे. भरपूर खत घालून धान्याची दर एकरीं पैदास वाढविण्याचेहि जोराचे प्रयत्न करण्यांत येणार आहेत. त्यासाठी १० जिल्ह्यांचीं प्रयोग-स्थलें म्हणून निवड करण्यांत आली आहे.

**अन्नमंत्र्यांचा अमेरिकेचा दौरा**—एप्रिल महिन्याच्या अखेरच्या आठवड्यांत अन्नमंत्री श्री. स. का. पाटील हे अमेरिकेचा दौरा करणार आहे. भारतांत ५० लाख टन अन्नधान्याचा राखीव सांठा हाताशीं ठेवण्याची जी योजना आहे ती अमलांत आणण्यासाठी अमेरिकेकडून धान्याची आयात कशी करतां येईल, तें पहाण्यासाठी ते जात आहेत.

**चहाच्या धंद्याला मदत**—हिंदमधील चहाच्या मळ्याच्या धंद्याला मदत करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें २ कोटि रुपयांची योजना आखली आहे. ह्या योजनेची अंमलबजावणी ताबडतोब सुरू होणार आहे. कोणत्याहि चहाच्या कंपनीला यंत्रसामुग्री व इतर साधनें ह्यांच्याकरतां २ लाख रुपयांपेक्षा अधिक मदत मिळणार नाहीं. पैशाच्या अभावीं जरूर ती यंत्रसामुग्री मिळवणें कारखान्यांना जड जात आहे, ह्यासाठी ही योजना आहे.

**गुजरातमधील साखर कारखाना**—सुरत जिल्ह्यांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा साखरेचा कारखाना काढण्यांत येत आहे. तो बहुधा १९६०-६१ च्या हंगामांत उत्पादन करूं लागेल. पंजाबमधील हरिया येथून कारखान्याची यंत्रसामुग्री विकत घेण्यांत आली आहे. ती बसविण्याच्या कामास लवकरच प्रारंभ होईल. यंत्रसामुग्रीसाठी १८ लाख रुपये किंमत पडली.

**अणुशस्त्रांच्या नाशाची तयारी**—सॅनफ्रॅन्सिस्कोचे मेयर मि. ख्रिस्टॉफर ह्यांच्याशीं बोलतांना रशिआचे पंतप्रधान मि. क्रुश्चेव्ह ह्यांनीं असें जाहीर केलें कीं, तपासणीची योग्य ती व्यवस्था ठेवून सर्व अणुशस्त्रांचा नाश करण्याची रशिआची तयारी आहे. रशिआ अमेरिकेवर हल्ला करण्याचा कट कधींहि करणार नाहीं, असेंहि ते म्हणाले.

**पोलंडच्या हॉकी संघाला शिक्षण**—रोम येथें भरविण्यांत येणाऱ्या ऑलिंपिक खेळांच्या दंगलींत भाग घेण्यासाठी पोलंड आपला हॉकीचा संघ पाठविणार आहे. संघाला खेळाचें शिक्षण देण्यासाठी पाकिस्तानमधील एक क्रीडापटु पोलंडला जाण्याचा संभव आहे. वॉरसा येथें ६ महिने राहून तो पोलंडच्या संघाला शिक्षण देईल.

## भारत सरकारची औद्योगिक गुंतवणूक

संपूर्णपणें सरकारी मालकी किंवा सरकारचें प्रभावी नियंत्रण असलेल्या औद्योगिक उपक्रमांचा तपशील. ( आकडे लक्ष रुपयांचे )

| नांव | सरकारची गुंतवणूक. १९५८–५९ अखेर (दुरुस्त अंदाज) | १९५९–६० मध्यें | १९६०–६१ मध्यें (बजेट) |
|---|---|---|---|
| **सरकारनें चालविलेले धंदे** | | | |
| अॅलॉय व टूल स्टील प्लँट | ... | २ | २५ |
| दुसरें शिपयार्ड | ... | ... | ११ |
| बायर्स इंटरमीजिएट प्रॉजेक्ट | ... | १९ | १० |
| ड्रग्स व फार्मास्युटिकल प्रॉजेक्ट | ... | ६ | ६० |
| हेवी प्लेट व व्हेसल्स प्रॉजेक्ट | ... | ... | ५ |
| नाहोरकातिया फर्टिलायझर्स प्रॉजेक्ट | ... | ... | ५ |
| हेवी स्ट्रक्चरल प्रॉजेक्टस | ... | ... | ५ |
| बेरीज | | २७ | १,२१ |
| **स्वायत्त संस्था व सरकारी कंपन्या** | | | |
| स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन | २०० | ... | ... |
| नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन | ४० | ... | ... |
| नॅशनल इं. डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन | १० | ... | १० |
| हिंदुस्थान अँटि-बायॉटिक्स (प्रा.) लि. | २,४७ | ... | ... |
| हिंदुस्थान इनसेक्टिसाइड्स (प्रा.) लि. | ९७ | ... | ... |
| हिंदुस्थान मशीन टूल्स ( प्रा. ) लि. | ४,८५ | ५५ | ... |
| नॅशनल इन्स्ट्रुमेंटस ( प्रा. ) लि. | ९१ | ... | ... |
| हिंदुस्थान सॉल्ट कं. (प्रा.) लि. | १४ | १० | ... |
| सिंद्री फर्टिलायझर्स अँड केमिकल्स ( प्रा. ) लि. | १७,०० | ... | ... |
| नाहन फौंड्री ( प्रा. ) लि. | ३० | ... | ... |
| हिंदुस्थान केबल्स ( प्रा. ) लि. | १,२५ | ... | ... |
| एक्सपोर्ट रिस्क इं. कॉर्पोरेशन | ५० | ... | ... |
| हेवी एंजिनिअरिंग कॉर्पोरेशन लि. | ९६ | २,०७ | ५,०० |
| हेवी इलेक्ट्रिकल्स लि. | ६,०० | ६,२२ | ८,८५ |
| हिंदुस्थान केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लि. | ९,१० | ६,६० | ८,८८ |
| प्राग टूल्स कॉर्पोरेशन लि. | ७० | ... | ... |
| नॅशनल न्यूजप्रिंट अँड पेपर मिल्स लि. | २,५५ | ... | ... |
| इंडियन हँडिक्राफ्ट्स डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन | १० | ... | ... |
| हिंदुस्थान एअरक्राफ्ट (प्रा.) लि. | १०,२० | ४,०० | ४,५० |
| भारत इलेक्ट्रॉनिक्स ( प्रा. ) लि. | ४,४६ | ५० | २५ |
| फिल्म फायनॅन्स कॉर्पोरेशन् | ... | २० | ... |
| नॅशनल प्रॉजेक्टस कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन | ५० | ... | ... |
| रीहॅबिलिटेशन इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन | ... | ७० | ३० |
| हिंदुस्थान स्टील ( प्रा. ) लि. | ३००,०० | ... | ... |
| नॅशनल कोल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ( प्रा. ) लि. | १०,९९ | ५,१४ | १३,१७ |
| निवेली लिग्नाइट कॉर्पोरेशन ( प्रा. ) लि. | १५,४९ | १३,०० | १९,८० |
| बोलाणी ओअर्स ( प्रा. ) लि. | ३० | ५ | ५ |
| सिंगारेणी कोलिअरीज ( प्रा. ) लि. | ... | १,२० | ... |
| इंडियन रिफायनरीज लि. | १,०० | २,३० | ६,०० |
| नॅशनल मिनरल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन | ५ | ७० | ९० |
| ऑईल इंडिया लि. | ४,०० | २,०० | ४,३३ |
| इंडियन ऑईल कं. | २ | ... | १० |
| म्हैसूर आयर्न अँड स्टील कॉर्पोरेशन | ... | १ | १ |
| ओरिसा मायनिंग कॉर्पोरेशन | ५ | ... | ३ |
| ईस्टर्न शिपिंग कॉर्पोरेशन | ८,२० | १,९५ | १,८० |
| वेस्टर्न शिपिंग कॉर्पोरेशन | ७,२५ | १,६० | २,७५ |
| इंडियन टेलिफोन इंडस्ट्रीज (प्रा.) लि. | ३,५९ | ... | ... |
| हिंदुस्थान शिपयार्डस | ४,६३ | २६ | ३८ |
| हिंदुस्थान हाऊसिंग फॅक्टरी (प्रा.) लि. | ... | ३ | ३० |
| मेसर्स इंडियन रेअर अर्थस् लि. | ६४ | ... | ... |
| त्रावणकोर मिनरल्स (प्रा.) लि. | २५ | ... | ... |
| बेरीज | ४,२१,५६ | ४९,४७ | ७७,२० |
| सरकारची एकूण गुंतवणूक | ४,२१,५६ | ४९,७४ | ७८,४१ |

ह्या गुंतवणुकीवर १९५७-५९ मध्यें १ कोटि, ६८ लक्ष रु. सरकारला नफा मिळाला; १९५९–६० मध्यें तो १ कोटि, ५१ लक्ष रु. भरेल आणि १९६०–६१ मध्यें तो १ कोटि, ३१ लक्ष उरेल, असा अंदाज आहे. सुमारें ५५० कोटी रुपयांच्या औद्योगिक गुंतवणुकीवर १⅓ कोटि रुपये नफा, म्हणजे कांहींच नाहीं.

**परदेशीय साह्याची जरूरी**—पाकिस्तानला आपला दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम पार पाडण्यासाठी ८०० कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची गरज आहे. परदेशांतील खाजगी भांडवल पाकिस्तानांत गुंतविण्याची शक्यता अजमावण्यासाठी पाकिस्तानचे उद्योगमंत्री १२ परदेशांचा दौरा करणार आहेत.

**सिनेमा-नटांचा संप**—हॉलिवुडमधील १४,००० सिनेमा नटांनीं बेमुदत संप जाहीर केला आहे. जे चित्रपट टेलिव्हिजन-वर दाखविण्यासाठी विकले जातात, त्यांच्या विक्रीमुळें होणाऱ्या नफ्यांतहि आपणांस वाटा मिळाला पाहिजे अशी त्यांची मागणी आहे. ह्या संपांत आतां स्टेजचे कामगारहि सामील झाले आहेत.

**अणुशक्तिवर चालणारीं वीज-केंद्रें**—भारतांत अणुशक्तीच्या साह्यानें वीज निर्माण करण्याचीं केंद्रें उभारण्याच्या कामीं रशिआनें मदत देऊं केली आहे. ह्या बाबतींत रशिअन तज्ज्ञांशीं भारताच्या अणुशक्ति मंडळानें नुकत्याच वाटाघाटी केल्या. अधिक तपशीलवार चर्चा करण्यासाठी भारताचें एक प्रतिनिधि मंडळ लवकरच रशिआला जाणार आहे.

**चित्रपट-संस्थेची स्थापना**—भारतांत एक फिल्म इन्स्टिटयूट स्थापन करण्यासाठी एखादा चालू असलेला सुसज्ज स्टुडिओ घेण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे. अशा प्रकारची संस्था काढण्याचा विचार १९५९ सालींच चालू होता. पण, योग्य अशा स्टुडिओच्या अभावीं ह्या बाबतींत फारशी प्रगति होऊं शकली नाहीं.

**नवीन रेडिओ घेणारांसाठी**—नव्यानें रेडिओ घेणारांसाठी रेडिओचा परवाना घेण्याची मुदत सरकारनें ७ दिवसांची ठरविली आहे. पूर्वीं रेडिओ घेण्याच्या आधींच परवाना मिळविण्याची व्यवस्था करावी लागे. आतां दुकानदारानें रेडिओच्या विक्रीचें सर्टिफिकेट देतांच त्याच्या आधारावर ७ दिवसांच्या आंत परवाना मिळूं शकतो.

# अर्थ

बुधवार, ता. १६ मार्च, १९६०





संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## पोलादाच्या कारखान्यांतील एंजिनिअरांचें शिक्षण

भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भारी उद्योगधंद्यांना प्राधान्य देण्यांत येणार आहेत. पोलादाचे कारखाने भारी उद्योगधंद्यांच्या प्रकारांतील एक महत्त्वाचा घटक असल्यामुळें पोलादाच्या कारखान्यांतील एंजिनिअर्सच्या शिक्षणाचा कस श्रेष्ठ दर्जाचा असला पाहिजे हें ओघानेंच येतें. पोलादाच्या कारखान्यांतील कामावर देखरेख करण्यासाठी हिंदी एंजिनिअर्सना ब्रिटन, अमेरिका, रशिया, इत्यादि देशांतील कारखान्यांतून शिक्षण देऊन तयार करण्यांत येत आहे. अमेरिकेंत अशा प्रकारचें शिक्षण घेण्यासाठी गेलेली ९३ हिंदी एंजिनिअरांची तुकडी आतां प्रत्यक्ष कारखान्यांत कामासाठी जाणार आहे. पण त्यांच्या शिक्षणाच्या बाबतींत एक अडचण निर्माण झाली आहे. अमेरिकन कारखान्यांत प्रत्यक्ष हातानें काम करण्याची व अशा रीतीनें कामांतील कसब हस्तगत करण्याची फारशी संधि एंजिनिअर्सना मिळत नाहीं. त्यामुळें शिक्षण घेऊन परत भारतांत आल्यावर येथील कारखान्यांतून त्यांना हस्तकौशल्य संपादण्यासाठी पुन्हा कांहीं काळ घालवावा लागतो. भारतीय एंजिनिअर्सना अमेरिकेंत देण्यांत येणाऱ्या शिक्षणाचा कस ठरविण्यासाठी अमेरिकन पोलाद तज्ज्ञांचें एक मंडळ सध्यां भारतांत आलें आहे. मंडळातर्फे असें सांगण्यांत आलें आहे कीं, हिंदी एंजिनिअर्सना प्रत्यक्ष काम करण्याची संधि मिळण्यासारखी नाहीं. कारण, अमेरिकेंतील कामगार संघटना ह्या गोष्टीला विरोध करतात. कांहीं हिंदी एंजिनिअर्सना अशी संधि मिळतहि असेल; पण कामगारांशीं त्यांनीं चांगले संबंध जोडल्याचा तो अपवादात्मक परिणाम असूं शकेल.

ह्यांच्या उलट, रशिआ व ब्रिटन ह्या देशांच्या पोलादाच्या कारखान्यांत जे हिंदी इंजिनिअर्स शिकण्यासाठी जातात त्यांना प्रत्यक्ष हातानें काम करण्याची संधि देण्यांत येते. त्यामुळें त्यांचा अनुभव त्यांना भारतामधील कारखान्यांत काम करतांना चांगला उपयोगी पडतो. ब्रिटनमधील पोलादाच्या कारखान्यांत ज्या कामगारांऐवजीं हिंदी एंजिनिअर्स काम करतात त्यांच्या वेतनाबद्दल कामगार-संघटनांशीं करार करण्यांत येतात. त्यामुळें कामगारांना आपलें वेतन बुडण्याची अगर कमी होण्याची भीति वाटत नाहीं. अमेरिकेंत मात्र अशा प्रकारची व्यवस्था करतां येणार नाहीं, असें मंडळातर्फे सांगण्यांत आलें आहे. ह्या परिस्थितीवर उपाय काय, असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. त्यावर अशी एक सूचना करण्यांत आली आहे कीं हिंदी एंजिनिअर्सना पुढील शिक्षणासाठी अमेरिकेंत धाडण्यापूर्वी भारतामधील कारखान्यांतूनच त्यांना कांहीं काळ हातानें काम करण्याची संधि देण्यांत यावी. हिंदुस्थान स्टील कंपनीनें असा निर्णय घेतला आहे असें समजतें. भारतांत आतां नवे पोलाद कारखाने उत्पादन करूं लागलेले आहेत. त्यामधून हिंदी एंजिनिअर्सना अशी संधि देतां येणें आतां शक्य झालें आहे. एंजिनिअर्सचें व्यावहारिक प्राथमिक शिक्षण अशा प्रकारें भारतांतच सुरू होईल. अधिक हिंदी एंजिनिअर्सना अमेरिकेंत शिक्षणासाठी पाठवितां यावें म्हणून हिंदुस्थान स्टील कंपनीतर्फे प्रयत्न करण्यांत येत आहे. पण ह्या प्रयत्नांना अमेरिकेंतील पोलादाचे कारखानदार व कामगार-संघटना ह्या दोघांचाहि थोडाबहुत विरोध दिसून येत आहे.

---

## चलनवृद्धीवर नियंत्रण ठेवण्यांत यश

ब्राझिलच्या अध्यक्षांचे आर्थिक सल्लागार मि. बी. फन्सेका ह्यांनीं भारताच्या विकास पावणाऱ्या अर्थव्यवस्थेसंबंधीं आपले विचार व्यक्त केले आहेत. ह्या विषयासंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं भारतामधील आर्थिक व्यवहारांची गति एकसारखी वाढत चालली आहे. अशा परिस्थितींत चलनवृद्धीवर नियंत्रण ठेवण्याचें काम अवघड असतें. पण, तें करून दाखविण्यांत भारताला यश आलें आहे. जगांतील अपुरा विकास झालेल्या इतर देशांशीं तुलना करतां भारतामधील चलनवृद्धीचें प्रमाण गेल्या कांहीं वर्षांत तरी बेताचेंच राहिलें आहे. ज्या देशाला आपली आर्थिक प्रगति करून घ्यावयाची आहे, त्या देशाला ती किंचितहि चलनवृद्धि होऊं न देतां करतां येईल असें म्हणणें म्हणजे स्वप्नरंजन आहे. भारतामधील आर्थिक प्रश्न हाताळण्याच्या कामीं सरकारनें व लोकांनींहि चिकाटी दाखविली आहे. भारतामधील जनतेनें सत्य परिस्थितीला शांतपणें व चिकाटीनें तोंड दिलें आहे. अपुरा विकास झालेल्या कोणत्याहि देशाला मूलभूत स्वरूपाचे उद्योगधंदे कसेहि करून उभारावेच लागतात. कारण, त्या उद्योगधंद्यांवरच देशांतील अर्थव्यवस्था अवलंबून असते. भारतानें हा प्रश्न यशस्वीपणें सोडविला आहे. उदाहरणार्थ, उद्योगधंद्यांना औद्योगिक शक्तीचा पुरवठा करण्यासाठी जलविद्युत् केंद्रांची उभारणी आधीं करण्यांत आली आहे व येत आहे. उद्योगधंद्यांच्या विकासासाठी जें वातावरण निर्माण व्हावें लागतें तें अशा योग्य धोरणानेंच निर्माण होऊं शकतें. उद्योगधंद्यांच्या विकासाच्या बाबतींत पौर्वापर्य विचार हा महत्त्वाचा आहे. नियोजन म्हटलें कीं असा विचार करणें अपरिहार्यच असतें. पण, तो करतांना पुष्कळदा अडचणींना तोंड द्यावें लागतें.

---

## कोलार खाणींतील सोन्याचें उत्पादन घटलें

म्हैसूर राज्यांतील कोलार येथील सोन्याच्या खाणींतील उत्पादन त्या खाणींचें राष्ट्रीयीकरण झाल्यापासून घटत चाललें आहे. पण, सोनें असलेली माती मात्र पूर्वी इतक्या प्रमाणांतच खणण्यांत येत आहे. १९५५-५६ सालीं खाणींमधून १,९३,४४३ औंस सोनें निघालें. १९५६-५७ सालीं उत्पादनाचा आंकडा १,८७,१०१ औंस झाला. १९५७-५८ सालीं १,६३,१२३ औंस आणि १९५८-५९ सालीं १,५०,७८१ औंस सोन्याचें उत्पादन झालें. एप्रिल १९५९ पासून जानेवारी १९६० पर्यंत खाणींतून १,२७,६१४ औंस सोन्याचें उत्पादन झालें. म्हैसूर सरकारच्या संबंधित खात्याचा ह्यासंबंधीचा अहवाल राज्याच्या

त्रिवान सभेंत मांडण्यांत आला आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं, खाणींतून जी सुवर्णमिश्रित माती बाहेर काढण्यांत येते तिचे-मधील सोन्याचें सरासरी प्रमाण कमी झाल्यामुळें उत्पादनांत घट झालेली आहे. उत्पादन॰ जास्त होण्यासाठी सुवर्णमिश्रित मातीचें खनन अधिक प्रमाणांत करतां येणें शक्य आहे. परंतु तीमधील सोन्याचे प्रमाण वाढविणें अर्थातच शक्यतेच्या कोटींत नाहीं. सोन्याचें प्रमाण अधिक असलेली माती एकसारखी निघूं शकणार नाहीं, हें उघडच आहे. खाणी चालविण्याची जबाब-दारी सरकारनें आपल्या अंगावर घेतल्यापासून कारभारांत् काटकसर करून उत्पादनाचा खर्च कमी करण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. सुवर्णमिश्रित माती खणण्याचा दर टनाचा खर्च १९५६ साली रु. ६७·८४ इतका होता, तो आतां म्हणजे १९५८–५९ साली रु. ६५·६३ इतका झाला आहे. उत्पादनाचा खर्च कमी करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांत अशा रीतीनें कांहीं प्रमाणांत यश येत आहे.

---

### रेल्वे उतारूंच्या भाड्यावरील कर

रेल्वे उतारूंच्या तिकिटांच्या भाड्यावरील कर सध्यां मैल अंतराप्रमाणें आकारण्यांत येतो, तो एप्रिल, १९६० पासून किलोमिटर अंतराप्रमाणें आकारण्यांत येईल. या तारखेपासून भारतीय रेल्वेच्या कमर्शियल विभागांत दशमान पद्धतीचीं वजनें-मापें सुरू करण्याच्या सरकारच्या निर्णयानुसार ही उपाययोजना करण्यांत येत आहे.

सध्यां १६ ते ३०, ३१ते ५०० आणि ५०० मैल अंतरावर अनुक्रमें ५, १५ व १० टक्के याप्रमाणें हा कर घेण्यांत येतो. एप्रिल १९६० पासून २६ ते ४९ किलोमिटर अंतरासाठीं ५ टक्के; ५० ते ८०५ किलोमीटर अंतरासाठीं १५ टक्के व ८०५ किलोमीटर अंतराहून अधिक प्रवासासाठी १० टक्के या प्रमाणें हा कर आकारण्यांत येईल. २५ किलोमीटर पर्यंत प्रवास करणाऱ्यांस हा कर लागू नाहीं. मायलेज कुपनवर प्रवास करणाऱ्या उतारूंना सध्यांप्रमाणेंच कुपनांच्या किंमतींच्या साडेबारा टक्के याप्रमाणें हा कर आकारण्यांत येईल. उपनगर गाड्यांतून सिझन तिकिटांवर प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून हा कर घेण्यांत येत नाहीं.

### १९५८ मध्यें खनिजांच्या उत्पादनांत सहा टक्क्यांनीं वाढ

भारतांतील खनिजांच्या उत्पादनांस १९५५ पासून सतत वाढ दिसून येत असून १९५८ मध्येंहि मागील वर्षापेक्षां उत्पादनांत वाढ दिसून आली. त्या वर्षी १३७·३ कोटी रु. किंमतीच्या खनिजांचें उत्पादन झालें. त्यामागील वर्षातल्या उत्पादनापेक्षा त्याची किंमत ८ कोटि रु. नी किंवा ६ टक्क्यांहून अधिक झाल्याचे इंडियन ब्यूरो ऑफ माइन्सनें नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या प्रकाशनांत म्हटलें आहे. या आंकडेवारींत पेट्रोलियम आणि १९४८ च्या ॲटोमिक एनर्जी ॲक्टाखालीं येणारीं खनिजे यांचा अंतर्भाव नाहीं.

सदर उत्पादनांतील वाढ कोळशाच्या व धातूव्यतिरिक्त खनिजांच्या उत्पादनांत वाढ झाल्याने झाली. कोळशाचें उत्पादन ४ कोटि ६० लक्ष ७ हजार मेट्रिक टन झालें. त्याची किंमत ८९·९ कोटि रु. होती. त्याखालील किंमतींच्या दृष्टीनें अशुद्ध मॅंगेनीज ( ११·२४ कोटि रु. ), मीठ ( ८·४६ कोटि रु. ), सोनें ( ५ कोटि रु. ), अशुद्ध लोखंड ( ४·८५ कोटि रु. ), अभ्रक ( २·५२ कोटि रु. ) आणि इल्मेनाइट ( १·८३ कोटि रु. ) यांचा क्रम लागतो. १९५८ मधील खनिजांच्या उत्पादनापासून भारताच्या निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नाच्या १·२ टक्के प्राप्ति झाली. सदर वर्षांत १११·५ कोटि रु. किंमतीचे धातूंचें उत्पादन होऊन नवीन उच्चांक प्रस्थापित झाला. धातूव्यतिरिक्त खनिजांचें उत्पादन १३·२ कोटि रु. किंमतीचें आलें.

खनिज उत्पादनाचा राज्यनिहाय विचार करतां सर्वांत जास्त किंमतीचें उत्पादन ( ४८·८ कोटि रु. ) बिहार राज्यांत आलें. त्यानंतर पश्चिम बंगाल व मध्यप्रदेश यांचा क्रम लागतो. खनिज उत्पादनास जास्त किंमत मुख्यत्वें बिहार, पश्चिम बंगाल, मुंबई, मध्यप्रदेश, राजस्थान व उत्तर प्रदेश या राज्यांमुळें मिळाली. परकीय चलन मिळविण्याचें एक मोठें साधन म्हणून खनिजांचा खास निर्देश करावा लागेल. १९५८ मध्यें अशुद्ध खनिजे व खनिजे यांच्या निर्यातीपासून एकूण ४६ कोटि रु. किंमतीचें परकीय चलन मिळालें. सदर वर्षांत देशास मिळालेल्या परकीय चलनाच्या उत्पन्नाच्या तें ८ टक्के आहे.


महाराष्ट्रांतील लहानमोठ्या उद्योगधंद्यांची आर्थिक अडचण तत्परतेनें दूर करून
महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासास संपूर्ण साह्य करणारी

( शिड्यूल्ड बॅंक ) **दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बॅंक लि. पुणें** ( स्थापना १९३६ )

मुख्य ऑफिस :—प्रेसिडेन्सी बॅंक बिल्डिंग, थोरले बाजीराव रस्ता, पुणें २. ( फोन नं. ६५६३ )
मुंबई शाखा :—८२ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १. ( फोन नं. २५३४०८ )

: संचालक मंडळ :

श्री. छोटालाल धरमसी जोशी ( प्रोप्रायटर–कमलाकांत छोटालाल ॲंड को. ( इम्पोर्टर्स, एक्सपोर्टर्स मुंबई ) अध्यक्ष.
श्री. गणेश उद्धव चितळे ( सुपरिंटेंडेंट, पैसाफंड कांच कारखाना ) उपाध्यक्ष.
श्री. गणेश रामचंद्र साठे ( डायरेक्टर, साठे बिस्किट ॲंड चाकोलेट कं. लि. पुणें )
श्री. चिंतामण त्र्िंबक चितळे ( ऑ. सेक्रेटरी, पैसाफंड ग्लास वर्क्स, तळेगांव )
श्री. वासुदेव पांडुरंग वैद्य ( इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनियर )
श्री. विनयकुमार नारायण सरदेसाई ( मॅ. डायरेक्टर, एशियाटिक इंडस्ट्रिअल एजन्सीज लि. मुंबई )
श्री. सदाशिव कृष्णाजी भागवत ( प्रोप्रायटर, राम एजन्सी ) पुणें.
श्री. मोहनलाल हंसराज लुनावत ( व्यापारी ) पुणें.

★ बॅंकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाच्या नवीन योजनेबाबत समक्ष भेटा.

—वी. वाय्. पाठक, ॲ. मॅनेजर.

## मांडवली मालाची आयात

### स्वतंत्र विभागाची स्थापना

चीफ कंट्रोलर ऑफ इंपोर्टस् अॅण्ड एक्सपोर्टस्, नवी दिल्ली यांच्या कचेरींत भांडवली मालाच्या आयात परवान्यांच्या अर्जांचा त्वरित निकाल लावण्यासाठी एक स्वतंत्र विभाग उघडण्यांत आला आहे. या विभागाचें काम पाहण्यासाठी एक स्पेशल ऑफिसर नेमण्यांत आला आहे. तेव्हां असे अर्ज यापुढें चीफ कंट्रोलर ऑफ इंपोर्टस् अॅण्ड एक्सपोर्टस् यांच्या नांवावर न पाठवितां या स्पेशल ऑफिसरच्या पत्त्यावर पाठवावेत.

तथापि सध्या जॉइंट चीफ कंट्रोलर ऑफ इंपोर्टस् मुंबई व कलकत्ता यांकडे याबाबत अर्ज पाठविण्यांत येतात. त्यांत या नवीन पद्धतीमुळें व्यत्यय येत नाहीं व व्यापाऱ्यांनीं पूर्वीप्रमाणेंच या अधिकाऱ्यांकडे अर्ज पाठवावेत.

निरनिराळ्या परवानाअधिकाऱ्यांची कार्यकक्षा यापुढें पुढील-प्रमाणें राहील.

| | |
|---|---|
| (१) जॉइंण्ट चीफ कंट्रोलर ऑफ इंपोर्टस्, मुंबई | कापड गिरणीची यंत्रसामुग्री, होजिअरी निटिंगची यंत्रसामुग्री व सुटे भाग. |
| (२) जॉइंण्ट चीफ कंट्रोलर ऑफ इंपोर्टस्, कलकत्ता | ताग व हेम्प यंत्रसामुग्री व सुटे भाग तसेंच कोळसा धंद्याशीं निगडित असलेली यंत्रसामुग्री. |
| (३) चीफ कंट्रोलर ऑफ इंपोर्टस् अॅण्ड एक्सपोर्टस्, नवी दिल्ली | इतर सर्व प्रकारची यंत्रसामुग्री व यंत्रभाग आणि १ लक्ष रुपयांवर किंमतीचे मशीनटूल्सचे सर्व भाग. (१ लक्ष रुपयांहून कमी किंमतीच्या मशीन टूल्ससाठी व्यापार व उद्योग खात्यांतील विकास विभागाकडून परवाने दिले जातात.) |

आयात परवान्यांसाठी केलेल्या अर्जांवर त्वरित निर्णय घेतां यावा म्हणून अर्जदारांनीं केवळ चलन विभाग न देतां, ते नेमक्या कोणत्या देशाहून आयात करणार तें स्पष्टपणें नमूद करावें. त्याचबरोबर पर्यायी देशाचें नांवहि नमूद करावें. त्याचप्रमाणें वस्तूंची आयात करण्यासाठी लागणारें परकीय चलन कशा प्रकारें उभारणार त्याचाहि समाधानकारक खुलासा अर्जदारानें दिला पाहिजे, नाहींतर परकीय चलनाच्या टंचाईमुळें अर्ज फेटाळण्यांत येण्याचा संभव आहे. परकीय भांडवल गुंतवणुकीच्या स्वरूपांत जरूर तें परकीय चलन मिळविण्याच्या शक्यतेसंबंधींहि अर्जदारांनीं माहिती द्यावी.

भांडवली मालाच्या व यंत्रसामुग्रीच्या आयातदारांनीं वस्तूंच्या आयातीसाठी भांडवलाची उभारणी ज्या विशिष्ट स्वरूपांत केली जाईल तें स्वरूप सरकारला मान्य आहे किंवा नाहीं याची खात्री मध्यवर्ती व्यापार व उद्योग खात्यांतील स्पेशल ऑफिसर (कॅपिटल गुड्स्) यांच्याकडून आगाऊ करून घ्यावी. त्याचप्रमाणें पुरवठादाराच्या पतीवर व दीर्घ मुदतीच्या उसनवारीनें वस्तूंची आयात करण्यास अगदीं अपवादात्मक प्रकरणींच परवानगी मिळेल.

## कामगारांच्या रहाणीवर महागाईचा परिणाम

### किंमतवाढीचा इंडेक्स नंबर (१९४९ = १००)

| | मुंबई | अहमदाबाद | कलकत्ता | मद्रास | कानपूर | दिल्ली | जमशेदपूर | अखिल भारत | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | सर्व बाबी | अन्न |
| वर्ष | | | | | | | | | |
| १९५५ | ११० | ८७ | ९२ | ९९ | ७८ | ९९ | ९८ | ९६ | ९२ |
| १९५६ | ११५ | ९८ | ९८ | १११ | ८९ | १०९ | १०६ | १०५ | १०५ |
| १९५७ | १२० | १०४ | १०५ | ११६ | ९४ | ११४ | ११५ | १११ | ११२ |
| १९५८ | १२९ | ११० | ११० | १२४ | ९८ | ११३ | १२३ | ११६ | ११८ |
| १९५९ | १३४ | १२५ | ११० | १३३ | ९८ | १२० | १२५ | १२२ | १२५ |
| आर्थिक वर्ष | | | | | | | | | |
| १९५५–५६ | ११० | ८९ | ९३ | १०० | ७९ | १०० | ९९ | ९६ | ९४ |
| १९५६–५७ | ११६ | १०१ | १०२ | ११३ | ९१ | ११२ | १०८ | १०७ | १०८ |
| १९५७–५८ | १२२ | १०४ | १०५ | ११७ | ९३ | ११२ | ११८ | ११२ | १११ |
| १९५८–५९ | १३० | ११५ | १०९ | १२६ | १०१ | ११७ | १२३ | ११८ | १२१ |
| १९५९ : | | | | | | | | | |
| जानेवारी | १२९ | १२१ | १०५ | १३० | १०३ | १२२ | ११५ | ११७ | ११९ |
| फेब्रुवारी | १३० | १२१ | १०४ | १२७ | १०३ | १२६ | १२० | ११८ | १२० |
| मार्च | १३१ | ११७ | १०४ | १२७ | ९९ | १२६ | १२१ | ११७ | ११८ |
| एप्रिल | १३० | ११९ | १०४ | १२८ | ९५ | ११९ | १२१ | ११७ | ११९ |
| मे | १३२ | १२४ | १०६ | १३१ | ९५ | ११६ | १२५ | ११९ | १२१ |
| जून | १३५ | १२५ | ११० | १३४ | ९७ | ११७ | १३० | १२२ | १२६ |
| जुलै | १३६ | १२७ | ११४ | १३४ | ९७ | ११७ | १२९ | १२४ | १२८ |
| ऑगस्ट | १३७ | १२५ | ११६ | १३४ | ९८ | ११८ | १२९ | १२५ | १२९ |
| सप्टेंबर | १३७ | १२९ | १११ | १३४ | ९७ | ११८ | १३० | १२५ | १२९ |
| ऑक्टोबर | १३९ | १३१ | ११६ | १३७ | ९८ | १२० | १३० | १२६ | १३१ |
| नोव्हेंबर | १३८ | १३० | ११४ | १३९ | ९९ | १२० | १२८ | १२६ | १३० |
| डिसेंबर | १३७ | १२५ | १११ | १३७ | ९६ | ११९ | १२७ | १२४ | १२८ |

## शेड्यूल्ड बँकांचीं तारणावरील कर्जें

( आकडे कोटी रुपयांचे )

| तारणाचें स्वरूप | डिसेंबर १९५७ | डिसेंबर १९५८ | डिसेंबर १९५९ | १९५८ मध्यें फरक | १९५९ मध्यें फरक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| (१) अन्नधान्यें | १४·७३ | १०·५९ | १४·५३ | –४·१४ | +३·९४ |
| १. भात व तांदूळ ... | ६·१८ | ५·४० | ७·८२ | –०·७८ | +२·४२ |
| २. गहू ... | २·१९ | ०·७३ | १·०८ | –१·४६ | +०·३५ |
| ३. इतर धान्यें व डाळी ... | ६·३६ | ४·४६ | ५·६३ | –१·९० | +१·१७ |
| (२) औद्योगिक कच्चा माल | ९२·४२ | ७१·९१ | ८३·८६ | –२०·५१ | +११·९५ |
| १. भुइमूग ... | ८·५१ | ९·१५ | ८·४५ | +०·६४ | –०·७० |
| २. इतर तेलबिया ... | ९·८९ | ७·९२ | ११·६४ | –१·९७ | +३·७२ |
| ३. कपास ... | ५२·८६ | ३८·८० | ४५·१९ | –१४·०६ | +६·३९ |
| ४. कच्चा ताग ... | १६·१३ | १०·७७ | १३·६७ | –५·३६ | +२·९० |
| ५. कातडी ... | ५·०३ | ५·२७ | ४·९१ | +०·२४ | –०·३६ |
| (३) मळ्यांचें उत्पादन | ३१·९२ | ४०·०५ | ३७·१६ | +८·१३ | –२·८९ |
| १. मिरच्या, इत्यादि मसाल्याचे पदार्थ ... | १·७० | १·९९ | ४·१९ | +०·२९ | +२·२० |
| २. काजू ... | २·१० | २·३० | १·८६ | +०·२० | –०·४४ |
| ३. चहा ... | २६·२५ | ३२·३४ | २७·१० | +६·०९ | –५·२४ |
| ४. कॉफी ... | १·८७ | ३·४२ | ४·०१ | +१·५५ | +०·५९ |
| (४) पक्का माल व खनिजें | ३०७·६९ | ३०६·०१ | ३३९·२८ | –१·६८ | +३३·२७ |
| १. साखर व गूळ ... | २६·४० | १९·२८ | २०·६२ | –७·१२ | +१·३४ |
| २. रबर व रबरी माल ... | २·१० | २·१८ | ३·६१ | +०·०८ | +१·४३ |
| ३. वनस्पति व इतर तेलें ... | ६·०४ | ४·७७ | ८·४२ | –१·२७ | +३·६५ |
| ४. कपास कापड ... | ९९·०८ | ९९·८३ | ९४·४७ | +०·७५ | –५·३६ |
| ५. ताग कापड ... | १६·७८ | २०·१२ | १४·९४ | +३·३४ | –५·१८ |
| ६. इतर कापड (रेशीम, आर्टसिल्क, लोकरी) ... | १३·४५ | १६·६१ | १९·१६ | +३·१६ | +२·५५ |
| ७. लोखंड, पोलाद ... | ९०·९१ | ८७·२५ | १०४·२६ | –३·६६ | +१७·०१ |
| ८. इतर धातु ... | ११·५५ | ११·८३ | १५·३२ | +०·२८ | +३·४९ |
| ९. कपास, मँगेनीज, अभ्रक, इ. ... | १०·२४ | ९·७७ | १२·६५ | –०·४७ | +२·८८ |
| १०. रसायनें, रंग, औषधें, इ. ... | १७·२९ | १४·३३ | २०·४४ | –२·९६ | +६·११ |
| ११. काच, पॉटरी ... | १·१९ | १·४० | २·९७ | +०·२१ | +१·५७ |
| १२. विजेचें साहित्य ... | ५·१५ | ५·२२ | ८·२३ | +०·०७ | +३·०१ |
| १३. सिमेंट ... | १·७८ | ४·५१ | ४·६४ | +२·७३ | +०·१३ |
| १४. कागद, न्यूज प्रिंट, स्टेशनरी ... | ५·७३ | ८·९१ | ९·५५ | +३·१८ | +०·६४ |
| (५) इतर तारण | २४७·९६ | २७२·२६ | ३०६·३६ | +२४·३० | +३४·१० |
| १. मालमत्ता ... | १५·६५ | २०·१४ | २३·२३ | +४·४९ | +३·०९ |
| २. सोनें चांदी ... | २·८७ | २·६० | ३·७८ | –०·२७ | +१·१८ |
| ३. मुदती ठेवी ... | ११·८० | १३·११ | १५·५५ | +१·३१ | +२·४४ |
| ४. सरकारी व ट्रस्टी रोखे ... | ४०·३४ | ४१·३६ | ४१·५० | +१·०२ | +०·१४ |
| ५. शेअर्स व डिबेंचर्स ... | ७३·२५ | ८१·१२ | ९१·१८ | +७·८७ | +१०·०६ |
| ६. कारखान्यांची इतर जिंदगी ... | ३२·८९ | ३७·१६ | ३४·२९ | +४·२७ | –२·८७ |
| ७. इतर तारणांवरील कर्जें ... | ५२·२७ | ५९·०५ | ८०·६२ | +६·७८ | +२१·५७ |
| ८. अनेक तारणांवरील मिळून कर्जें ... | १८·८९ | १७·७२ | १६·२१ | –१·१७ | –१·५१ |
| (६) तारणावरील एकूण कर्जें (१+२+३+४+५) ... | ६९४·७३ | ७००·८२ | ७८१·१९ | +६·०९ | +८०·३७ |

**लोखंडाच्या खनिजाची निर्यात**—भारत आणि जपान ह्यांच्यामध्यें, लोहमिश्रित मातीची निर्यात करण्याचा करार करण्यांत आला आहे. मध्यप्रदेशांतील बस्तर जिल्ह्यांतून दरसाल ४० लाख टन माती जपानला निर्यात करण्यांत येणार आहे. कराराच्या अंमलबजावणीस १९६६ पासून प्रारंभ होईल. कराराची तात्पुरती मुदत १५ वर्षांची ठेवण्यांत आली आहे.

**राजकन्येचा कारकुनाशीं विवाह**—जपानच्या राजघराण्यांतील एका राजकन्येनें तिथल्या बँकेंतील कारकुनाशीं विवाह केला आहे. राजघराण्यांतील मुलींनी पाळावयाच्या रीतिरिवाजांपासून व इतर बंधनांपासून ती आतां मुक्त झाली आहे. तिच्या कारकून यजमानांना दरमहा अवघा ५० डॉलर्स पगार मिळतो.

## रावेर पीपल्स को. बँकेचा रौप्यमहोत्सव

"हल्लीं समाजांत सहकार प्रवृत्ति मान्यता पावत चालल्या आहेत. मनुष्य कुटुंबसुखाचे व्याप्तीची लक्ष्मण-रेषा ओलांडून गांवाचें सुख, समाजाचें सुख यांकडे पावलें टाकीत आहे. त्यासच आपण सहकार समजतों. नुकत्या सहभावनेनें समाज एकत्र येणार नसून सहकारानें एकत्र येणार आहे. सहकारामागील ही दिव्य प्रेरणा आहे." या शब्दांत सहकारमंत्री नामदार बाळासाहेब भारदे यांनीं दि. ६-३-६० रोजीं रावेर पीपल्स को. बँकेच्या रौप्य-महोत्सवाच्या समारंभाच्या अध्यक्ष-पदांवरून "सहकारा"ची मीमांसा विद्वत्तापूर्ण शब्दांत केली. नामदार पुढें म्हणाले, "सर्वांनीं सुखानें असावें, सर्वांनीं आनंदांत रहावे अशी प्रार्थना आपण अनादिकालापासून करतों. परंतु माझा आनंद, माझें सुख, कमी न होतां दुसऱ्यांनीं सुखानें रहावें असें आम्हांला वाटतें. व्यक्तीचें सुख सोडून समिष्टीच्या सुखाकडे जाण्यासाठी मनुष्याला सहकाराची कास धरावी लागते."

सुमारें ५००-६०० लोकांचे समुदायापुढें सुशोभित मंडपांत नामदारांनीं अधिकारवाणीनें बँका व सहकार यांचें सुंदर विवेचन केले. बरोबर दुपारीं ५ वाजतां "रौप्य-महोत्सव" समारंभास सुरुवात झाली. सुरुवातीस बँकेचे अध्यक्ष श्रीमंत राजे जे. आर. देशमुख यांनीं नामदारसाहेबांचें स्वागत केल्यावर त्यांच्या शुभहस्तें संस्थेचे आद्यसंस्थापक श्रीमंत राजे भाऊसाहेब देशमुख यांच्या तैलचित्राचा अनावरण समारंभ झाला. त्या सत्काराला उत्तर देतांना श्री. भाऊसाहेबांनीं संस्था ह्या उर्जितावस्थेस येण्यास कारणीभूत झालेल्या दुसऱ्या अनेक व्यक्तींचा सादर उल्लेख केला. त्याच्याबरोबर संस्थेच्या जन्मापासून संस्थेच्या सेक्रेटरीपदाची जबाबदारी कौशल्यपूर्णपणें पार पाडून तिला हल्लींच्या उर्जितावस्थेस आणण्यास कारणीभूत झालेले श्री. उघळीकर यांचा नामदारसाहेबांचे हस्तें महावस्त्र व श्रीफल देऊन सत्कार करण्यांत आला. रौप्य-महोत्सव समारंभाची समाप्ति अल्पोपहारांत झाली. त्यावेळीं देशमुखवाडा विद्युद्दीपांनीं चमकत होता. रौप्य-महोत्सवसमारंभापूर्वी नामदारसाहेबांनीं रावेर तालुका खरेदी-विक्री संघाला भेट दिली, व त्यांच्या मागण्या ऐकून त्यांस तावडतोब उत्तरें दिलीं.

त्यांच्या मुक्कामांतील शेवटचा कार्यक्रम प्रवचनाचा होता- ज्ञानेश्वरींतील "हें समस्त श्रीवासुदेव" ह्या ओवीवर एकतास. पर्यंत नामदार भारदे यांनीं अत्यंत रसाळ, सोप्या भाषेंत अद्वैत सिद्धांताची चर्चा केली. त्यावेळीं अमृतानुभव, ज्ञानेश्वरींतील संदर्भ श्लोक व ओव्या, तसेंच एकनाथ, नामदेव व तुकाराम ह्यांच्या ग्रंथांतील समर्पक अभंग मुखोद्गत म्हणून त्यांनीं आपल्या अगाध विद्वत्तेचें प्रत्यंतर दाखविलें.

### CO-OPERATION & ACCOUNTANCY DIPLOMA BOARD, POONA

In pursuance of the Co-operation and Accountancy Diploma Board Resolution, passed at the Board Meeting held on 27th January, 1960 at Bombay the following candidates are declared to have passed the full G. D. C. & A. Examination.

(1) Shri. P. N. Pimple
(2) Shri. A. C. Desai
(3) Shri. S. B. Khadayate

V. L. Inamdar,
*Secretary,*
Co-operation and Accountancy
Diploma Board, Poona.

8th March, 1960

## बँकांच्या कर्जावर रिझर्व्ह बँकेचें नवें नियंत्रण

### चलनवाढ आणि महागाई ह्यांवर उपाययोजना

रिझर्व्ह बँकेनें ११ मार्च, १९६० रोजीं काढलेल्या प्रेस-नोटचा सारांश खालीलप्रमाणें आहे:—

(१) सध्यां प्रत्येक शेड्यूल्ड बँकेला रिझर्व्ह बँकेकडे, स्वतःच्या 'डिमांड' देण्याच्या ५% व 'टाइम' देण्यांच्या २½% एवढी रक्कम ठेव म्हणून ठेवावी लागते. शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींत ११ मार्चनंतर जेवढी वाढ होईल, तिच्या २५% रक्कम रिझर्व्ह बँकेकडे ठेवावी लागेल. प्रत्येक बँकेला ठेवींवर द्यावें लागणारें व्याज लक्षांत घेऊन, तिच्या रिझर्व्ह बँकेंतील जादा ठेवींवर रिझर्व्ह बँक व्याज देईल.

(२) शेअर्सच्या तारणावरील बँकांचीं कर्जे गेल्या कांहीं महिन्यांत फार वाढलीं आहेत. बँकांना आतां अशा कर्जावर किमान ५०% मार्जिन राखावें लागेल. ५,००० रुपयांखालील कर्जांना व प्रेफरन्स भागांना हा नियम लागू नाहीं. एका महिन्याचे आंत बँकांनीं आपलीं कर्जे ह्या नियमांत आणावयाचीं आहेत. स्टॉक एक्सचेंजच्या ब्रोकर्सचे बाबतींत तीन महिन्यांची मुदत दिली आहे.

(३) बँका चालू सेटलमेंटसाठीं स्वतःच्या नांवावर शेअर्स घेतात आणि पुढच्या सेटलमेंटसाठीं ते विकतात. अशा प्रकारच्या बदला व्यवहारास बंदी करण्यांत येत आहे.

(४) बँकांच्या 'क्लीन' किंवा तारणरहित कर्जाचें एकूण कर्जाशीं प्रमाण १९५९ च्या तुलनात्मक महिन्याचे मानानें वाढतां कामा नये.

रिझर्व्ह बँकेच्या ह्या उपाययोजनेमुळें शेअरबाजारांतील महत्वाचे शेअर्स एकदम बरेच घसरले. रिझर्व्ह बँकेच्या उपायानें मूळ रोग तात्पुरता शमला तरी तो नाहींसा होणार नाहीं; मध्यवर्ती सरकारचें तुटीच्या अर्थव्यवस्थेचें (चलनवाढीचें) धोरण बदलल्याखेरीज महागाईस खरा आळा बसणार नाहीं, असें मत व्यक्त केलें जात आहे.

---

### सर्व बँकांच्या तंट्यासाठी राष्ट्रीय ट्रायब्यूनलची नेमणूक

बँक-अवार्डची मुदत ३१ मार्च, १९५९ रोजीं संपली, परंतु उभयपक्षांच्या संमतीनें किंवा त्यानंतरच्या निवाड्यानें त्यांतील तरतुदी जोंपर्यंत बदलल्या गेल्या नाहींत, तोंपर्यंत अवार्डचा अंमल चालूच राहणार. बँका व त्यांचें नोकर ह्यांचेमधील तंटा मिटविण्याचे बाबतींत सरकारनें प्रयत्न केले, पण अखेर इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स अॅक्टाखाली नवें ट्रायब्यूनल नेमण्याचा निर्णय घेतला आहे. स्टेट बँक ऑफ इंडिआ आणि तिचे नोकर ह्यांचेमधील तंटाहि ह्या ट्रायब्यूनलकडेच सोपविला जाईल. बँक-नोकरांची मागणी बँक-कमिशनच्या नेमणुकीची होती, कारण ट्रायब्यूनलच्या कामाला बराच वेळ लागतो. वरिष्ठ न्यायालयांकडे अपिलें करण्यांत आलीं म्हणजे तर फारच विलंब लागतो. बँकांनीं शक्य तों अपिलें टाळावीं अशी सरकारची खटपट आहे.

---

संतकवीचे जन्मस्थान—दक्षिण भारतामधील प्रसिद्ध संतसंगीतज्ञ व कवी त्यागराज २०० वर्षांपूर्वी ज्या घरांत जन्माला आले, ते तिरुवापूर येथील घर तिरुवापूर संगीत कमिटीनें विकत घेण्याचें ठरविलें आहे. ह्या घराची किंमत सुमारें १५,००० रुपये आहे. ह्याच संस्थेनें आणखी दोन दाक्षिणात्य संगीत-विशारदांचीं जन्मस्थानें विकत घेतलीं आहेत.

**STURDY** *Elegence*

**STABILITY** *Precision*




Great pyramids and sphynx in Egypt are a puzzle to the modern world. They possess incredible intricacy of sturdiness and craftsmanship. They stand centuries together undamaged—Really a wonderful example for sturdiness. As well it is miracleously intricated with craftsmanship. Very few are the examples of such type where sturdiness & elegance go hand in hand.

Similarly in machinery world of today, sturdiness and precision workmanship is well needed. A slightest mistake in designing and workmanship means- an immeasurable loss of money, time and work.

*We stand for ....*

- Cams & keys of various types.
- Plastic & Rubber plantation equipment, Extruders, Spreading machines & mixing mills.
- Chemical Engineering equipment, Auto-cloves, pressure-pans, Kiers etc.
- Calenders, Beaters and presses of various types
- Die-punches & moulds.

***For success***



**THE SOUTHERN MACHINE INDUSTRIES**
GULTEKDI ROAD, SWARGATE POONA 2.

Proprietor . SUPANEKAR BROS.

Phone : 6640
Gram : 'SOUMACHINE'

PARKERSON



**कण आणि क्षण**
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक : —श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.



**'अर्थ' ग्रन्थमाला**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.